जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४२ दिनांक - १६/०१/२०२४**

विश्रामबाग पोलिस स्टेशन पुणे शहर

# सराईत मोटार सायकल चोर शंकर भरत देवकुळे यास शिताफीने अटक करुन त्याच्याकडुन चोरीच्या एकुण ०९ मोटार सायकल जप्त

पुणे शहर पोलीस आयुक्तालया अंतर्गत विश्रामबाग पोलीस ठाणे हद्दीमध्ये वाहन चोरीचे गुन्हे रोखण्याकरीता व दाखल गुन्हे उघडकीस आणण्याकरीता करावयाच्या उपाययोजना बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विश्रामबाग पोलीस स्टेशन श्री.रविंद्र गायकवाड,यांनी तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक बरुरे व अंमलदार यांना सुचना व मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे अधिकारी व अंमलदार यांनी मोटार सायकल चोरी झालेल्या घटनास्थळावर भेट देवुन सदर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व कॉल डिटेल तपासले असता रेकॉर्ड वरील सराईत मोटार सायकल चोर शंकर भरत देवकुळे रा.धाराशिव हा मोटार सायकल चोरी करीत असल्याचे उघड झाले.

मोटार सायकल चोर शंकर देवकुळे हा फिरस्ती असुन तो धाराशिव, पुणे, मुंबई तसेच सोलापुर जिल्हयामध्ये आपले वेगवेगळी नांवे सांगुन पोलीसांकडुन आपले अस्तित्व लपवुन वेगवेगळया ठिकाणी वास्तव्य करत होता. त्यामुळे त्याचे निश्चित राहण्याचे ठिकाणाबाबत माहीती मिळत नसल्याने तो मिळुन येत नव्हता.विश्रामबाग पोलीस ठाणे कडील पो.उप.निरी.बरुरे, पो.अमंलदार अशोक माने,मयुर भोसले,आशिष खरात यांचे पथक तयार करुन आरोपी शंकर देवकुळे याचा शोध सुरु केला असता पथकाने आरोपी शंकर देवकुळे याचा टेंभुर्णी,इंदापुर,सोलापुर,बार्शी,धाराशिव,पुणे येथे आरोपीचा मागमुस काढत सतत ०७ दिवस शोध घेवुन त्यास अतिशय शिताफीने ताब्यात घेतले.ताब्यात घेवुन त्याच्याकडे तपास केला असता त्याने यापुर्वी वेळोवेळी विश्रामबाग पोलीस ठाणे व इतर पोलीस ठाणे हद्दीतुन चोरी केलेल्या एकुण ०९ मोटार सायकल काढुन दिलेल्या असुन त्या गुन्हयाचे तपासकामी जप्त करण्यात आलेल्या आहेत.

**जप्त केलेल्या ०९ मोटार सायकलीचे वर्णन खालील प्रमाणे**

| अ.क्र. | जप्त मोटार सायकलचे वर्णन | पोलीस स्टेशन गुरनं व कलम |
|---|---|---|
| ०१ | होंडा कंपनीची शाईन मॉडेलची मोटार सायकल एम.एच.१२.आर.झेड.२८१५चेसी.नं ME4JC65DHKG055077 इंजिन नं.- JC65EG0115480 | विश्रामबाग पोलीस ठाणे, गुरनं.२६०/२०२३ भादवि कलम ३७९ |
| ०२ | होंडा युनीकॉर्न एमएच ४२ एसी ६४७६ चेसी नं ME4KC09CMD8625382 इंजिन नं.KC09E-8-6635398 | विश्रामबाग पोलीस ठाणे, गुरनं.१५८/२०२२ भादवि कलम ३७९ |
| ०३ | होंडा शाइन एमएच १९ एसी ७१४३ चेसी नं ME4JC652LF7117147 इंजिन JC65E70385169 असा असलेली | विश्रामबाग पोलीस ठाणे, गुरनं.२०८/२०२३ भादवि कलम ३७९ |

| | | |
|---|---|---|
| ०४ | होंडा शाईन एमएच ३० बीई ४८११ चेसी नं ME4J658LH7035188 इंजिन नं 7C65E71343296 असा असलेली | विश्रामबाग पोलीस ठाणे, गुरनं.२७०/२०२३ भादवि कलम ३७९ |
| ०५ | होंडा शाईन एमएच १६ बीबी ११८३ चेसी नं ME4JC36KDD7208800 इंजिन नं JC36E-7-7598718 असा असलेली | भोसरी पोलीस ठाणे, गुरनं. ७८६/२०२३ भादवी कलम ३७९ |
| ०६ | हिरो स्पेलंडर एमएच १४ डीएस ५६३८ चेसी नं MBLHA10ASCHK09133 इंजिन नं HA10ELCHK09979 असा असलेली | भोसरी पोलीस ठाणे, गुरनं. ७९४/२०२३ भादवी कलम ३७९ |
| ०७ | स्पेलंडर एमएच १२ एन क्यु ३४५५ चेसी नं MBLHA10CGGHJ29566 इंजिन नं.HA10ERGHJ40592 असा असलेली | सिंहगड पोलीस ठाणे गुरनं.४७८/२०२३ भादवी कलम ३७९ |
| ०८ | स्पेलंडर एमएच १२ युयु ७७७१ चेसी नं MBLHAW123N5G60131 इंजिन नं HA11EDN5G03850 असा असलेली | हडपसर पोलीस ठाणे, गुरनं.१०/२०२४ भादवी कलम ३७९ |
| ०९ | होंडा युनीकॉर्न एमएच २४ एआर ६५३१ चेसी नं ME4KC311EH8033971 इंजिन नं KC31E-8-0033970 असा असलेली | पिंपरी पोलीस ठाणे,गुरनं १०९४ भादवी कलम ३७९ |

विश्रामबाग पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन अतिशय शिताफीने आरोपी नामे शंकर भरत देवकुळे वय ३२ वर्षे रा फकीरानगर, वैरागनाका, ता जि.धाराशिव यास अटक केलेली असुन त्याच्याकडुन एकुण ०९ मोटार सायकल जप्त करुन मोटार सायकल चोरीच्या एकुण ०९ गुन्हयाची उकल केलेली आहे.

सदरची कारवई मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम पादेशिक विभाग पुणे शहर श्री.प्रवीण पाटील, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ श्री.संदीपसिंग गिल, मा.सहा पोलीस आयुक्त विश्रामबाग विभाग पुणे शहर श्री.वसंत कुवर यांच्या सुचना व मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र गायकवाड, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.दादा गायकवाड, तसेच पोलीस उपनिरीक्षक,मनोज बरुरे, पोलीस उपनिरीक्षक, संतोष मोरे, पो.अमलदार अशोक माने,मयुर भोसले,गणेश काठे,प्रकाश बोरुटे,हेमंत पालांडे, महावीर वलटे, आशिष खरात,अर्जुन थोरात,संतोष शेरखाने,नितीन बाबर,राहुल मोरे,अर्जुन कुडाळकर यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज बरुरे करीत आहेत.

**पुणे शहर पोलीसांकडुन नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

१) नागरिकांनी प्रत्येक वाहनास जीपीएस लावुन घ्यावे.
२) आपले वाहन पार्कीग करतेवेळी सीसीटीव्हीच्या निगराणीखाली पार्क करावे.
३) नागरिकांनी वाहन रस्त्यावर लावु नये. ठरवुन दिलेल्या पार्कीग मध्येच लावावे.
४) वाहन पार्क करुन जातेवेळी वाहनाला चावी सोडुन जावु नये.


पोलीस ठाणे
फरासखाना
विश्रामबाग
वाहतुक विभाग
MH.24.AD 8115
MH.02.DT.8303